**शिवम विरुध्द आनंद**

**आदेश निशाणी क्रमांक ४७ वर**

**पारित दिनांक ०२.०५२०२३**

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी यांनी त्यांच्याविरूध्द झालेला "विना म्हणणे" हा आदेश रद्द होवून प्रतिवादी यास आपले म्हणणे दाखल करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादीच्या मते, प्रतिवादी यांना वेळेत कागदपत्र उपलब्ध न झाल्याने मुदतीमध्ये म्हणणे दाखल करता आले नाही. प्रतिवादीचे विधीज्ञांना कौटूंबीक व वैदयकीय अडचणिंमूळे न्यायालयात हजर राहता आले नाही व निशाणी ४४ वर म्हाणणे दाखल करता आले नाही. त्याळे प्रतिवादी विरूध्द 'विना म्हणणे' आदेश पारित झालेला आहे. प्रस्तूतचे कारण हे जाणूनबूजून व हेतूपुरस्सर घडवून आणलले नाही. नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार होवून प्रतिवादी यास आपली बाजू मांडणेची संधी देणे न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे त्याच्या विरूध्द झालेला विना म्हणणे आदेश रद्द करणेत यावा व अर्जासोबत दिलेले म्हणणे स्वीकारण्याची अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करून सदर अर्जास आक्षेप नोंदविला आहे. वादीने असे कथन केले आहे की, निशाणी क्र.४४ वर म्हाणणे देणेसाठी प्रतिवादीला दिनांक २४.०३.२०२३, २७.०३.२०२३, ३१.०३.२०२३, ०७.०४.२०२३, १३.०४.२०२३ अशी पुरेपूर संधी दिलेली आहे आणि अर्जाची काम प्रलंबीत केलेले आहे. प्रतिवादीने जाणीवपुर्वक प्रस्तूतचे दाव्याचे कामकाज लांबवीलेले आहे त्यामूळे प्रतिवादीचा अर्ज रुपये ५,०००/– खर्चावर नामंजुर करणेत यावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

४. दावा, प्रस्तूतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला

आहे. वादीने तारीख २०.०३.२०२३ रोजी निशाणी क्र.४४ वरील अर्ज दाखल केलेला आहे. माननीय प्रमुख जिल्हा न्यायाधिश, सोलापूर यांचे आदेशानूसार प्रस्तूतचे प्रकरण हे जलद गतीने चालविणेचे आदेशीत केलेले आहे. त्यानूसार, म्हणणे देण्यासाठी प्रतिवादीला पुरेशी संधी दिली होती. प्रतिवादीने कारण नमूद केल्याप्रमाणे जरी विलंब हेतुपूरस्सर नसला तरी, प्रतिवादी स्वतः हा सुध्दा प्रत्यक्ष कोणत्याही तारखेला उपस्थीत राहून म्हणणे दाखल करण्यासाठी मुदत मागीतली नाही.

५. परंतू, दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ नुसार प्रकरण गुणा गुणावर चालण्यासाठी प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर येणे गरजेचे दिसून येते. तसेच प्रतिवादीने प्रस्तूतच्या अर्जासोबत प्रतिवादीने निशाणी क्र.४४ वरील म्हणणे दाखल केल्यामूळे प्रतिवादीचे प्रस्तुत कामातील स्वारस्य दिसून येते. प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर आल्यास वादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. प्रस्तूत कारणांचा विचार करता प्रतिवादी विरूध्द विना म्हणणेचा आदेश रद्द करणेस कोणतीही हरकत दिसून येत नाही. तरी, सबब झालेला विलंब भरुन काढणेसाठी प्रतिवादीवर खर्चाची रक्कम लादणे योग्य ठरेल. त्यामुळे मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये ३००/– इतक्या खर्चावर मंजुर करणेत येतो.

२. प्रतिवादी याने खर्चाची रक्कम पुढील तारखेस किंवा त्याआधी वादीला देणेची आहे.

३. प्रतिवादी खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतरच प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर नोंदवले जाईल.

४. प्रतिवादीने खर्चाची रक्कम भरणेस कसुर केलेस प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

दिनांक– ०२/०५/२०२३ श्रीमती एस. ए. साळुंखे

ठिकाण– पंढरपूर ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर